<u>नियमित दिवाणी दावा नं. ५९/२०१८</u>

<u>निशाणी क्रमांक ६८ वरील आदेश</u>

<u>सी.एन.आर.क्र. MHK0110004842018</u>

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र. ३ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६ नियम १७ अन्वये तसेच क्रम १ नियम १०(२) अन्वये दाव्याकामी दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** प्रस्तुत अर्जाद्वारे वादी क्र. ३ यांचे असे कथन आहे की, वादी क्र. १ व २ यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचे विरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे. त्यानंतर मा. न्यायालयाच्या हुकुमाने दिनांक ०५/०५/२०१८ रोजीच्या जाहीर नोटीस नुसार वादी क्र. ३ हे प्रस्तुत कामी हजर झाले. त्यानंतर वादी क्र. ३ यांना निशाणी क्र. ३८ वरील आदेशान्वये सामिल करण्यात आले. वादी क्र. ३ ही धर्मादाय सेवा संस्था आहे. सदर संस्थेचा नोंदणी क्र. ई–३०६८ असा असून संस्थेच्या ट्रस्ट–डीड (विश्वस्त व्यवस्थापन) नुसार संस्थेचा मुख्य उद्देश शैक्षणीक क्षेत्रामध्ये कार्य करणे असून कै. बॅरिस्टर श्रीमंत बाळासाहेब उर्फ भवानसिंह खर्डेकर निंबाळकर यांनी सुरू केलेल्या शिक्षण प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या कारभारात संस्थेच्या उन्नती करिता सर्वतोपरी मदत करणे असा आहे.

**०३.** वादी क्र. ३ पुढे कथन करतात की, प्रतिवादी क्र. २ शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष कै. बॅरिस्टर बाळासाहेब उर्फ भवानसिंह हणमंतराव खर्डेकर निंबाळकर हे होते. त्यांनी संस्था संन १९४५ साली नोंदणी करताना स्वतःची ५० एकर शेत जमीन व कागल येथील घर मिळकत संस्थेस बहाल करून त्यावर संस्थेचा कारभार सुरू केला. महाराष्ट्र राज्य व कर्नाटक राज्य या दोन प्रांतामध्ये सर्वसाधारणपणे एकुण अंदाजे २५ शाळा, माध्यमिक शिक्षण संस्था,

महाविद्यालये, वस्तीगृहे यांची स्थापना केली. सदर संस्थेच्या बाबतीत प्रतिवादी क्र. २ यांनी गैरकारभार केला आहे. या सर्व मालमत्ता, संस्थेचा कारभारावर प्रतिवादी क्र. २ यांचे स्वहित असून संस्थे विरोधी कार्यभार असल्याने प्रस्तुत दाव्याकामी न्याय निवाडा होणे व दाव्याची व कायद्याची गुंतागुंत टाळणेकरिता प्रस्तुत अर्जाकामी प्रतिवादी क्र. ८, ९ यांना सामिल करणेबाबत तसेच अर्जामध्ये नमुद दावा मिळकती वाढविणेबाबत, परिच्छेद क्र. १अ ते १उ मध्ये नमुद मजकूर वाढविणे तसेच परिच्छेद क्र. ८अ मध्ये मजकूर बदल करणे, परिच्छेद क्र. १० मध्ये बदल करणे, दाव्यास कारण मध्ये बदल करणे त्याचबरोबर दाव्याची आकारणी मध्ये बदल करणे, दाव्यातील विनंती व मागणीमध्ये वाढ करणे याप्रमाणे दुरूस्ती होणेबाबत विनंती केली आहे.

**०४.** प्रस्तुत अर्जास वादी क्र. १ व २ यांनी त्यांचे म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्जास तिव्र विरोध केला आहे. वादी क्र. १ व २ यांचे कथनाप्रमाणे वादी क्र. ३ यांच्या मागणीप्रमाणे दुरूस्ती केल्यास मुळ दाव्याचे स्वरूपात बदल होणार आहे. वादी क्र. १ व २ यांनी दावा अर्जी कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीबाबत दाद मागत आहेत तर वादी क्र. ३ यांनी त्यांचे स्वतःचे स्वार्थासाठी संपूर्ण मिळकतींचा उल्लेख केला असून तशी दाद वादी क्र. ३ यांना मागता येणार नाही. वादी क्र. ३ यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर झालेस मुळ दाव्याचा हेतूच असफल होणार आहे. याबाबत वादी क्र. ३ यांना स्वतंत्र दावा दाखल करण्याची मुभा आहे. सबब, वादी क्र. ३ यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी वादी क्र. १ व २ यांनी विनंती केली आहे.

**०५.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. ३ तर्फे निशाणी क्र. ७६ कडे म्हणणे दाखल करून तिव्र विरोध दर्शविण्यात आलेला आहे. तर प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांचे म्हणणे हे प्रतिवादी क्र. १ यांचे वतीने वाचण्यात यावे अशी पुरसीस निशाणी क्र. ७७ कडे दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. १ व ३ यांचे कथनाप्रमाणे वादी क्र. १ व २ यांनी प्रस्तुतचा दावा हा केवळ कसबा वडगांव येथील

सि.स.नं. ११६/१अ बाबत केलेला आहे. प्रस्तुत दाव्याकामी नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर वादी क्र. ३ हे हजर झाले आहेत. त्यामुळे सदरचा दावा हा मुळ वादी क्र. १ व २ तसेच वादी क्र. ३ यांचा झालेला आहे. त्यानंतर वादी क्र. ३ यांनी नमुद दुरूस्ती अर्ज दाखल केला. प्रस्तुत अर्जावर वादी क्र. १ व २ यांच्या सह्या नाहीत. नमुद दुरूस्ती अर्जामध्ये वादी क्र. ३ यांनी वेगवेगळ्या मिळकतींचा उल्लेख केलेला आहे. वादी क्र. ३ हे अर्जाद्वारे जी दाद मागत आहेत त्या मिळकतींबाबत मुळ वादी क्र. १ व २ यांचे कोणत्याही प्रकारचे हितसंबंध असणेचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे नमुद दुरूस्ती वादी क्र. ३ यांना करता येणार नाही.

**०६.** प्रतिवादी पुढे कथन करतात की, वादी प्रस्तुत अर्जाद्वारे जी दुरूस्ती मागत आहेत ती मागणेची झालेस त्यांना स्वतंत्र दावा दाखल करून दाद मागणे आवश्यक आहे. वादी क्र. ३ यांनी प्रस्तुत अर्जासोबत आवश्यकती कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. वादी क्र. ३ यांनी ज्या मिळकतींचा उल्लेख केलेला आहे त्या मिळकतीशी प्रतिवादी क्र. २ संस्थेशी काहीही संबंध नाही. मुळ वादी यांचा दावा हा केवळ वडगांव येथील सि.स.क्र. ११६/१अ या मिळकतीबाबत आहे. वादी क्र. ३ यांच्या नमुद अर्जातील दुरूस्तीद्वारे मुळ दाव्याचे प्रतिनिधीक स्वरूपाचे असून कायद्यान्वये वादी क्र. ३ यांना असे करणेचा कोणताही हक्क व अधिकार नाही. प्रस्तुत दुरूस्तीमुळे मुळ अर्जाचे स्वरूप बदलणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी विनंती केली आहे.

**०७.** प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील वादी क्र. १ व २ तसेच प्रतिवादी क्र. १ व ३ यांचे म्हणणे व संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ, प्रतिवादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ यांचा सखोल युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. २, ४, ५, ६ व ७ यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द विना म्हणणेचा आदेश पारित करण्यात आला.

०८. सदरील अर्जाच्या अनुषंगाने वादी क्र. ३ तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी खालील न्यायनिर्णयातील प्रमेयांचा आधार घेतला.

| | |
|---|---|
| **1.** | ***<u>Revajeetu Builders & Ors. Vs. Narayanaswamy & Sons & Ors., reported in 2009(6) ALL MR 986.</u> in which Hon'ble Apex court held that, Order 6 Rule 17 - Amendment of pleadings – Conditions to be satisfied. Amendment must be necessary for deciding real question in controversy – Other important condition is that it must not result in prejudice or injustice to other party – Court exercise its power judiciously and with great care.<br>Basic principals to be taken into consideration while allowing or rejecting amendment stated -<br>Some important factors which ought to be taken into consideration while allowing or rejecting the application for amendment are as fallows -<br>1) Whether the amendment sought is imperative or proper and effective adjudication of the case ?<br>2) Whether the application for amendment is bonafide or malafide ?<br>3) The amendment should not cause such prejudice to the other side which cannot be compensated adequately in terms of money;<br>4) Refusing amendment would in fact lead to injustice or lead to multiple litigation.<br>5) Whether the proposed amendment constitutionally or fundamentally changes the nature and character of the case ? and<br>6) As a general rule, the court should decline amendments if a fresh suit on the amended claims would be barred by limitation on the date of application, there are only illustrative and not exhaustive.*** |
| **2.** | ***<u>M/s. R. K. Patel Engineers & Contractors Pvt.Ltd. Vs. City & Industrial Development Corporation of Maharashtra Ltd. & Anr. Reported in 2014(4) ALL MR 783.</u> In which Hon'ble High Court held that, Order 6 Rule 17 - Amendment to plaint – Plaintiff seeks to add better particulars, averments and documents which where missed out by earlier advocate. Purpose of allowing amendment is*** |

| | |
|---|---|
| | ***minimizing litigation – Court has while power to allow amendment at any stage of proceedings – So far only issue have been framed, parties have not even filed affidavit of examination-in-chief - Amendment allowed.*** |
| **3.** | ***Olga Rodrigues & Ors. Vs. Christopher Pinto & Ors., reported in 2017(4) Bom.C.R. 755.** **In which Hon'ble High Court held that, Order 6 Rule 17, Courts do not go into correctness or falsity of case in amendment. Court only looks at is whether amendment is necessary for determining real question in controversy between parties provided it does not prejudice or cause injustice to other side.***<br>***It is settled law that, while considering the application under Order 6 Rule 17 of The Code of Civil Procedure, 1908 the courts do not go into the correctness or falsity of the case in the amendment. What the Court only looks at is whether the amendment is necessary for determining the real question in controversy between the parties provided it does not prejudice or cause injustice to the other side. Rule of amendment is essentially a rule of justice, equity and good conscience and power of amendment should be exercised in the larger interest of doing full and complete justice to the parties before the Court.*** |
| **4.** | ***Fr. Ralin De. Souza & Anr. Vs. Goa Busketball Association & Anr., reported in 2017(7) ALL MR 716.** **In which Hon'ble High Court held that, Order 6 Rule 17 - Amendment of pleadings – Whether likely to change nature of suit – Case that petitioners represented respondent – Association Federation without any authority - By proposed amendment, respondent sought to bring on record certain acts of petitioners committed subsequent to filing of suit which have been in nature of representation of respondent without any authority – Relief additionally being sought by proposed amendment, could have been asked by filing another suit – No change of or addition of subsequent cause of action – In fact, these amendments would have to be seen as necessary for determining real issues in controversy or avoiding*** |

| | |
|---|---|
| | ***multiplicity of proceedings – No case that any serious prejudice caused to petitioners by allowing amendment – No illegality in allowing amendment.*** |
| **5.** | ***Smt. Pinky Devi & Anr. Vs. Mr. Krishnamurthy Santappa Govilekar, reported in 2014(1) ALL MR 714.*** ***In which Hon'ble High Court held that, Order 6 Rule 17 - ~Amendment of plaint - Plaintiffs want to bring clarity in description of property and averments – Defendants contend that trial has commenced - There cannot be change in description of property - Defendants allege they will be prejudiced by amendments – Held, suit is at stage of 'framing of issues' - Hence, trial cannot be said to have begun – Court cannot under this application get into suit what suit property includes and not – introduction of new prayers declined - Certain clarifying amendments allowed for the effectual and complete adjudication of the dispute.*** |
| **6.** | ***Mr. Abhay Arondekar Vs. Mrs. Helen Prisca Correia & Ors., reported in 2013(6) ALL MR 712.*** ***In which Hon'ble High Court held that,***<br>***A) Order 6 Rule 17 Pre-trial amendment – Allegations sought to be incorporated were not inconsistent with original plaint – Amendment can be allowed.***<br>***B) Merits and demerits of pleadings sought to be incorporated cannot be gone into – All objections of parties on merits of proposed amendment including point of limitation will have to be decided while deciding suit on merits.*** |

०९. वादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी युक्तीवाद केला की, वादी प्रस्तुत अर्जान्वये जी दुरूस्ती मागत आहेत त्याने दाव्यातील मुळ वाद कथनास स्पष्टता येणार असून वादी प्रस्तुत दुरूस्तीन्वये कोणतीही नवीन बाजू न्यायालयात घेऊन येत नाहीत. प्रस्तुतच्या दुरूस्तीने दाव्यांचे बाहुल्य कमी होणार असून गुंतागुंत देखील वाढणार नाही.

१०. याउलट प्रतिवादी तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी युक्तीवाद केला की,

सदरील अर्जामध्ये कोणतेही संयुक्तीक कारण नमुद नाही. वादी क्र. ३ यांनी स्वतंत्र दावा दाखल करून दाद मागणे आवश्यक आहे. वादी क्र. ३ यांनी प्रस्तुत अर्जासोबत आवश्यकती कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. वादी क्र. ३ यांनी ज्या मिळकतींचा उल्लेख केलेला आहे त्या मिळकतीशी प्रतिवादी क्र. २ संस्थेशी काहीही संबंध नाही. मुळ वादी यांचा दावा हा केवळ वडगांव येथील सि.स.क्र. ११६/१अ या मिळकतीबाबत आहे. वादी क्र. ३ यांच्या नमुद अर्जातील दुरूस्तीद्वारे मुळ दाव्याचे प्रतिनिधीक स्वरूपाचे असून कायद्यान्वये वादी क्र. ३ यांना असे करणेचा कोणताही हक्क व अधिकार नाही. प्रस्तुत दुरूस्तीमुळे मुळ अर्जाचे स्वरूप बदल होणार असून दाव्याचे कारणात देखील बदल होणार आहे. अशापरिस्थितीत वादी यांची दुरूस्तीची मागणी मंजूर करता येणार नाही.

**११.** उपरोक्त न्यायनिवाडयांचे सुक्ष्म अवलोकन करून त्यातील प्रमेये लक्षात घेतले. पुढे संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा वादपत्रातील दुरूस्तीसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६ नियम १७ अन्वये केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६ नियम १७ अन्वये, ***न्यायालयास दाव्याचे कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोपैकी कोणत्याही पक्षकारास त्यांच्या वादकथनास न्याय असेल अशारितीने व अशा अटींवर फेर बदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करणेसाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा करण्याची परवानगी देता येईल.*** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६ नियम १७ चे परंतुकान्वये ***न्यायचौकशी सुरू झाल्यानंतर पक्षकारांनी योग्यती खबरदारी घेऊन सुध्दा न्यायचौकशी सुरू होण्यापूर्वी दुरूस्ती बाबतची बाब पुढे का आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झाले असल्याखेरीज दुरूस्ती अर्ज अनुज्ञेय असणार नाही.***

**१२.** अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दाव्याकामी न्याय्यचौकशी सुरू झालेली नाही. त्यामुळे प्रस्तुत दुरूस्ती अर्जामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६ नियम १७ चे परंतूकाकडे न जाता वादी तर्फे प्रस्तुतची दुरुस्ती मागत असताना दाव्यातील पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करणेसाठी प्रस्तुतची मागणी केलेली दुरूस्ती आवश्यक आहे किंवा नाही त्याचबरोबर सदरच्या दुरूस्तीने विरुध्द पक्षकारास अन्याय होणार आहे का तसेच दाव्याचे स्वरूप बदलणार आहे का हे देखील पाहणे आवश्यक आहे.

**१३.** प्रस्तुत दाव्यातील वादपत्राचे अवलोकन केले असता वादी क्र. ३ प्रस्तुत अर्जान्वये अधिक प्रतिवादी सामिल करू इच्छीतात तसेच दाव्याच्या कारणामध्ये (Cause of action) देखील बदल करू इच्छीतात. त्यामुळे केवळ वादी क्र. ३ प्रस्तुतचा दावा नवीन वाद (Cause of action) घेऊन येत आहेत. वादी क्र. १ व २ यांनी सदरील प्रास्ताविक दुरूस्तीस हरकत नोंदविली आहे. सदरचा दावा हा प्रातिनिधीक स्वरूपाचा असल्यामुळे दावा विषयावर सर्व वादींचे हितसंबंध असल्याचे दिसून येत नाही. वादी क्र. ३ यांचे युक्तीवादाप्रमाणे प्रस्तुत दुरूस्तीच्या मागणीद्वारे वादी हे मुळ वाद कथनास स्पष्टीकरण देण्याबाबतची देणारी दुरूस्ती मागत आहेत. परंतू वादी यांच्या मागणी केलेल्या दुरूस्तीचे अवलोकन केले असता वादींनी मागणी केलेली दुरूस्ती ही केवळ मुळ कथनास स्पष्टीकरण देणारी नाही. सदरची दुरूस्तीची मागणी ही मंजूर केलेस प्रतिवादी यांचेवर अन्याय (Cause Prejudice) होणार आहे. तसेच दाव्याचे मुळ स्वरूप बदलणार आहे. प्रस्तुतची दुरूस्तीची मागणी ही प्रामाणिक पणाची (Bonafide) दिसून येत नाही. कारण प्रस्ताविक दुरूस्तीबाबत सक्षम प्राधिकारी यांचेकडे प्रकरण प्रलंबित असल्याचे अभिलेखावर दिसून येते. तसेच प्रस्तुत दुरूस्तीचे स्वरूप पाहता प्रस्तुत मागणी केलेली दुरूस्ती ही प्रस्तुत दाव्यातील पक्षकारांमधील खराखुरा वादप्रश्न निश्चित होणेकरिता महत्वाची आहे असे दिसून येत

नाही. अशापरिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

**१.** वादी यांचा निशाणी क्र. ६८ चा अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

SANDEEP DEVIDAS SONAWANE
Digitally signed by SANDEEP DEVIDAS SONAWANE
Date: 2023.01.05 15:36:34 +0530

**पेठ–वडगांव.** **( एस. डी. सोनवणे )**
**दिनांक ०४/०१/२०२३** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.**